तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.२३/२०२५

प्रो.डॉ. नाईक मंजुश्री चंद्रशेखर
रा.सर्वे नं.२२८/१, गाळा नं. ४,
रो बंगलो, हडको कॉलनी, जि.सांगली ४१६४१६ } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. चेअरमन, लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली
राजनेमी परिसर, वुडहाउस रोड,सांगली ४१६४१६

२. श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली
राजनेमी परिसर, टिंबर एरिया, सांगली ४१६४१६ } वि.प.

लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली या शिक्षण संस्थेचे श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली येथील प्रो.डॉ. नाईक मंजुश्री चंद्रशेखर यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२४/११/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

तक्रारीचे स्वरूप :

मी, प्रो.डॉ.मंजुश्री चंद्रशेखर नाईक रसायनशास्त्र विभाग, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली येथे प्राध्यापक म्हणून २००३ पासून कार्यरत आहे. मी एक मागासवर्गीय महिला असून गेल्या काही वर्षापासून माझ्या सेवाजेष्ठतेचा सातत्याने अवमान करण्यात येत आहे. माझ्या सेवाजेष्ठतेबाबत मला योग्य हक्क असूनही, महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी माझी सेवाजेष्ठता मान्य न करता मला सातत्याने अन्यायकारक वागणूक दिली आहे. हा प्रकार पूर्णपणे माझ्या शैक्षणिक प्रतिष्ठेला व सेवेला अन्यायकारक व नुकसानकारक आहे. देशात जिथे महिला सक्षमीकरण केले जात आहे. इथे महिलेवर अन्याय करून मागे खेचले जात आहे.

महाविद्यालयाचा अभिप्राय-

१. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्रं. एनजीसी २०१०/४१५/१० विशि-१, दि.०७ सप्टेंबर २०११ २. Higher & Technical Education

department, Government of Maharashtra, Government Resolution No. NGC-2010/415/10) UNI-1 Dated 30th july, 2010 नुसार सेवाजेष्ठता यादी लठठे एज्युकेशन सोसायटी, सांगली यांचेकडून तयार करणेत आली आहे.

समितीची निरीक्षणेः-

तक्रारदार यांची मूळ तक्रार अशी की, काही वर्षापासून त्यांच्या सेवाज्येष्ठतेचा अवमान होत असून सेवाज्येष्ठतेबाबत त्यांना योग्य हक्क असून महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी त्यांची सेवाज्येष्ठता मान्य न करता त्यांना सातत्याने अन्यायपूर्वक वागणूक दिली आहे. संस्थेमार्फत तयार करण्यात आलेल्या सेवाज्येष्ठता यादीत त्यांचे नाव कनिष्ठाच्या खाली नमूद करण्यात आलेले आहे. याबाबत त्यांनी पत्रव्यवहार करून देखील संस्थेने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. तरी याप्रकरणाची सखोल चौकशी करून सेवाज्येष्ठतेबाबत योग्य न्याय द्यावा. याप्रकरणी प्राचार्यांविरूद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

तक्रारदार यांनी दि.११/०५/२०२६ रोजीचे विस्तृत लेखी म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये त्यांची नियुक्ती सन २००३ मध्ये रसायनशास्त्र विभाग, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली येथे झाली. त्यांचे सहकारी डॉ.आर.बी.कुपवाडे हे संस्थेमध्ये सन २०११ मध्ये नियुक्त झाले आहेत. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार संस्थेने तयार केलेल्या वरीष्ठता यादीमध्ये डॉ.आर.बी.कुपवाडे यांचे नाव तक्रारदार यांच्या वरती दर्शविण्यात आले असून तक्रारदार यांचे नाव त्यांच्या खाली दर्शविण्यात आले आहे.

सदर बाब नियुक्ती दिनांक व सेवाज्येष्ठता निकषाच्या विरोधात असल्याचे म्हणणे त्यांनी समितीसमोर सादर केले. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या नियुक्तीनंतर नियुक्त झालेल्या व्यक्तीस वरिष्ठ दर्शविणे ही अन्यायकारक बाब असून त्यांच्या सेवाज्येष्ठतेवर व भविष्यातील बाबींवर प्रतीकुल परिणाम करणारी आहे. तरी त्याचे पुर्नपरिक्षण व्हावे व योग्य ती दुरुस्ती करून मिळावी ही समितीस विनंती केली आहे. तक्रारदार यांनी उपरोक्त म्हणण्यास खालील मुद्दयांचा आधार घेतला आहे.

१. "पदसेवाज्येष्ठता"(Cadre Seniority)आणि "सेवाज्येष्ठता" (Length of Service Seniority) या दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या असून त्यामध्ये फरक आहे. एखाद्या कर्मचा-याचा विशिष्ट

कॅडरमध्ये प्रवेश केलेला दिनांक हा पदसेवाज्येष्ठतेसाठी विचारात घेतला जावू शकतो, मात्र संस्थेमधील एकूण सलग सेवा, नियुक्ती दिनांक व सेवाकाल हे सेवाज्येष्ठतेसाठी महत्त्वाचे निकष आहेत.

२. मी संस्थेमध्ये सन २००३ पासून कार्यरत असून संबंधित कर्मचारी सन २०११ पासून कार्यरत आहेत. त्यामुळे सेवाज्येष्ठतेच्या दृष्टीने माझी सेवा अधिक कालावधीची आहे ही वस्तुस्थिती आहे.

३. त्यामुळे वरीष्ठता यादी तयार करताना कोणत्या प्रकारची वरिष्ठता-पदसेवाज्येष्ठता अथवा सेवाज्येष्ठता- विचारात घेतली आहे, हे स्पष्ट करण्यात यावे ही नम्र विनंती. तसेच संबंधित नियम, शासननिर्णय अथवा विद्यापीठाच्या तरतुदीच्या आधारे अंतिम निर्णय घेण्यात यावा.

४. माझ्यापेक्षा नंतर नियुक्त झालेल्या व्यक्तीस वरिष्ठ दर्शविणे हे अन्यायकारक बाब असून त्यामुळे माझ्या सेवाज्येष्ठतेवर व भविष्यातील प्रशासकीय/शैक्षणिक बाबींवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

तक्रारदार यांनी तक्रारीच्या पृष्ठार्थ त्यांचे दि.०५/०८/२०२३ रोजीचे नियुक्ती पत्र तसेच नावासंदर्भात महाराष्ट्र शासन राजपत्र, प्र.कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा दिलेल्या (या पत्रावर तारीख अथवा शिवाजी विद्यापीठ कार्यालयाची कोणतीही पोहोच दिसून येत नाही.) तसेच लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली यांचे सन २०२४-२५ ची शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी सोबत जोडली आहे. श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली येथे मे २०२५ आणि जून २०२५ याची मस्टर कॉपी जोडली आहे. तक्रारदार यांनी संस्थेचे चेअरमन यांना दि. २४/०४/२०२५ रोजी सेवाज्येष्ठता यादी बाबत हरकत व दुरुस्ती करण्याबाबत पत्र जोडले आहे. शिवाजी विद्यापीठ, संलग्नता विभाग यांनी दि.०९/०८/२०२३ रोजी महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवाज्येष्ठता नियमावलीबाबत प्रसिद्ध केलेले पत्र व त्यासोबत विद्यापीठाने दि.१४/१२/२००९ रोजी प्रसिद्ध केलेली सेवाज्येष्ठता नियमावलीची नियमावली जोडली आहे.

उपरोक्त तक्रार व त्याअनुषंगाने समितीसमोर सादर केलेले विस्तृत म्हणणे याची प्रत संस्था व महाविद्यालयास देण्यात आली आहे. तक्रार अर्जावरील महाविद्यालयाच्या अभिप्रायामध्ये -

१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनजीसी-२०१० (४१५/१०)वि.शि-१ दि.०७/०९/२०११

२) Higher & Technical Education department, Government of Maharashtra, Government Resolution No. NGC-2010/415/10) UNI-1

Dated 30th july, 2010 नुसार सेवाजेष्ठता यादी लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली यांचेकडून तयार करणेत आली आहे. तसेच लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली यांचेकडे या संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला होता असे म्हणणे नमूद केले आहे.

तक्रारदार यांनी सदर महाविद्यालयाचे प्राचार्य हे दि. ३१/०५/२०२६ रोजी सेवानिवृत्त होत असल्याने त्यांच्या तक्रारीची पुढील सुनावणी शक्य तितक्या लवकर घेण्याबाबत विनंती केल्याने सर्वच पक्षकारांचे लेखी म्हणणे सादर करणेकरिता या प्रकरणाची तारीख दि.१६/०५/२०२६ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु या तारखेस संस्था व महाविद्यालयाकडून कोणीही प्रतिनिधी हजर न होता ई-मेल व हस्तलिखित पुढील तारीख देणेबाबत या समितीत अर्ज प्राप्त झाला. या समितीने तक्रारदार यांचे या अर्जावर म्हणणे घेतले. तक्रारदाराने या अर्जाबाबत तीव्र आक्षेप नोंदविला. नैसर्गिक संधी उपलब्ध करून देण्याकरीता विस्तृत म्हणणे मांडण्याकरिता सात दिवसांची मुदत देऊन पुढील तारीख देण्यात आली व प्रकरण अंतिम सुनावणीस नेमण्यात आले. संस्था व महाविद्यालयाने उपरोक्त नमूद केलेनुसार पुनःश्च तेच मुद्दे लेखी म्हणण्यामध्ये सादर केले आहेत.

उपरोक्त तक्रारदाराची तक्रार, संस्था व महाविद्यालयाने सादर केलेले लेखी म्हणणे व उपलब्ध कागदपत्रे यांचा समितीने सखोल अभ्यास केला. तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीच्या पृष्ठार्थ शिवाजी विद्यापीठाचे दि.०९/०८/२०२३ क्र.संलग्नता टी १/प्रशांत/८७० या पत्राचा आधार घेऊन त्यानुसार त्यांची तक्रार योग्य असल्याचे ठामपणे म्हणणे मांडले आहे. या पत्राबाबत समितीने संलग्नता टी १ विभागाकडील अधिकारी यांचेकडून वस्तुस्थिती जाणून घेतली. याबाबत समितीच्या असे निदर्शनास आले की, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या दि.२२/०६/२०२३ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.७ मधील दुरुस्ती ठरावानुसार महाविद्यालयीन शिक्षकांची सेवाज्येष्ठता नियमावली अंतिम होईपर्यंत पूर्वीची सेवाज्येष्ठता नियमावली (दि.१४/१२/२००९ रोजीची) लागू राहील, असे पत्र संलग्नता टी.१ विभाग यांनी शिवाजी विद्यापीठ अंतर्गत येणा-या सर्व संलग्नित महाविद्यालये, प्राचार्य, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांना कळविले आहे.

परंतु, समितीच्या असे निदर्शनास येते की, UNIVERSITY GRANTS COMMISSION NOTIFICATION NEW DELHI, THE 18TH JULY, 2018 UGC REGULATIONS ON MINIMUM QUALIFICATIONS FOR APPOINTMENT OF TEACHERS AND

OTHER ACADEMIC STAFF IN UNIVERSITIES AND COLLEGES AND MEASURES FOR THE MAINTENANCE OF STANDARDS IN HIGHER EDUCATION, 2018 मधील 16.3 नुसार-

16.3-Inter-se seniority between the direct recruited and teachers promoted under CAS The inter-se seniority of a direct recruit shall be determined with reference to the date of joining and for the teachers promoted under the CAS with reference to the date of eligibility as indicated in the recommendations of the selection committee of the respective candidates. The rules and regulations of the respective Central/State Government shall apply, for all other matters of seniority.

थेट भरतीद्वारे नियुक्त झालेल्या शिक्षकांच्या परस्पर ज्येष्ठता त्यांच्या रूजू झाल्याच्या दिनांकाच्या संदर्भाने निश्चित केली जाईल. तर कॅस अंतर्गत पदोन्नती मिळालेल्या शिक्षकांच्या ज्येष्ठता संबंधित उमेदवारांच्या निवड समितीच्या शिफारशींमध्ये नमूद केलेल्या पात्रता दिनांकाच्या संदर्भाने निश्चित केली जाईल.

सदर विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना महाराष्ट्र शासनाने दि.०८/०३/२०१९ रोजी स्वीकारलेली असून त्यामध्ये २१.०(c) नुसार-

c) Inter-se seniority between the direct recruited and teachers promoted under CAS The inter-se seniority of a direct recruit shall be determined with reference to the date of joining and for the teachers promoted under the CAS with reference to the date of eligibility as indicated in the recommendations of the selection committee of the respective candidates. The Rules and regulations of the State Government shall apply, for all other matters of seniority.

विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचनेमधील १६.३ ची पुर्नरावृत्ती होवून कॅस अंतर्गत शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेबाबत तरतूद स्पष्ट केली आहे. सदर शासननिर्णय मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ यांनी

स्वीकारला असून त्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १२(८) अंतर्गत आदेश पारित केले आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता, समितीच्या असे निदर्शनास येते की, विद्यापीठातील संलग्नता टी १ विभागाकडून जारी करण्यात आलेले दि.०९/०८/२०२३ रोजीचे पत्र हे विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचना २०१८ त्यासंदर्भातील शासननिर्णय दि.०८/०३/२०१९ यामधील तरतुदी आणि मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १२(८) नुसार पारीत केलेल्या आदेशास विसंगत आहे. विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचना २०१८ तसेच शासननिर्णय दि.०८/०३/२०१९ मध्ये कॅस अंतर्गत सेवाज्येष्ठतेबाबत स्पष्ट तरतूद दिलेली असून देखील त्यास विसंगत पत्र काढले आहे. उपरोक्त विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचना २०१८, शासननिर्णय दि.०८/०३/२०१९ व त्यास अनुसरून मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या आदेशांमुळे संलग्नता विभागाकडील दि.०९/०८/२०२३ रोजीच्या पत्रास कायदेशीर आधार राहत नसल्याने निष्प्रभ ठरते.

सबब, या प्रकरणामध्येदेखील पदोन्नती झालेल्या शिक्षकांची त्यांच्या प्रथम नियुक्ती दिनांकावर आधारीत नसून कॅस अंतर्गत निवड समितीने शिफारस केलेल्या पात्रतेच्या तारखेनुसार निश्चित होईल. त्यानुसार तक्रारदार यांनी सादर केलेल्या सन २०२४-२५ च्या सेवाज्येष्ठता यादीवरून असे स्पष्ट होते की, कॅस अंतर्गत प्रा.डॉ.आर.बी.कुपवाडे दि.०२/०९/२०२४ रोजी प्रोफेसर पदावर पदोन्नत झाले आहेत व तक्रारदार डॉ. नाईक या दि.२३/१२/२०२४ रोजी कॅस अंतर्गत पदोन्नत झाल्याचे दिसून येते.

या सर्व बाबी विचारात घेवून समिती या निष्कर्षास येते की, संस्थेच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये कॅस अंतर्गत पदोन्नत झालेले प्रा.डॉ.आर.बी.कुपवाडे हे तक्रारदार यांच्या आधी प्रोफेसर पदास पात्र झाले आहेत. सबब संस्थेने त्यांना वरिष्ठ दर्शविल्याची कृती योग्य आहे.

सबब, समितीसमोरील उपलब्ध कागदपत्रे, शासननिर्णय, विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचना, मा. कुलगुरू यांचे आदेश तसेच कॅस संदर्भातील लागू तरतुदींच्या आधारे समिती या निर्णयाप्रत येते की, तक्रारदार यांनी उपस्थित केलेल्या तक्रारीत या समितीने हस्तक्षेप करण्याजोगे पर्याप्त तथ्य आढळून येत नाही. करिता समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

तक्रार अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 27 MAY 2026

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. तक्रार निवारण समिती

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.ए.बी.साळी)

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)